# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

**प्रेसनोट**

# पुणे शहरातील शिवसृष्टी व स्वामी नारायण मंदिर या स्थळांचा पीएमपीएमएल कडून पर्यटन बससेवेमध्ये समावेश

पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत सर्व प्रवाशी नागरिकांकरीता पुणे, पिंपरी-चिंचवड शहर व लगतच्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कार्यक्षेत्रातील खालील धार्मिक, तीर्थ व पर्यटन स्थळांच्या भेटीकरीता दिवशी दिनांक ०१/०५/२०२३ पासून विशेष पर्यटन बससेवा सुरू करण्यात आली आहे.

- **पर्यटन बससेवा क्र. १ -** हडपसर गाडीतळ – मोरगांव गणपती दर्शन – जेजुरी दर्शन – हडपसर गाडीतळ.
- **पर्यटन बससेवा क्र. २ –** हडपसर गाडीतळ - सासवड (सोपानकाका मंदिर, संगमेश्वर मंदिर) – नारायणपूर - बालाजी मंदिर (केतकावळे) - बनेश्वर मंदिर - कोंढणपूर मंदिर, हडपसर गाडीतळ (कात्रज मार्गे).
- **पर्यटन बससेवा क्र. ३ –** डेक्कन जिमखाना - खारावडे म्हसोबा देवस्थान - टेमघर धरण - निळकंठेश्वर पायथा – डेक्कन जिमखाना.
- **पर्यटन बससेवा क्र. ४ -** पुणे स्टेशन - खडकवासला धरण – पानशेत धरण - सिंहगड पायथा - पुणे स्टेशन.
- **पर्यटन बससेवा क्र. ५ -** पुणे स्टेशन – पुलगेट – हडपसर – रामदरा - थेऊर गणपती – प्रयागधाम – हडपसर.
- **पर्यटन बससेवा क्र. ६ -** पुणे स्टेशन - वाघेश्वर मंदिर (वाघोली) – वाडेबोल्हाई मंदिर – तुळापूर त्रिवेणी संगम - छत्रपती संभाजी महाराज समाधी (वढू बुद्रुक) - रांजणगांव गणपती मंदिर - पुणे स्टेशन.
- **पर्यटन बससेवा क्र. ७ -** भक्ती शक्ती निगडी – अप्पूघर – इस्कॉन मंदिर (रावेत), मोरया गोसावी मंदिर (चिंचवड) - प्रतिशिर्डी (शिरगांव) - देहूगांव गाथा मंदिर – आळंदी - भक्ती शक्ती निगडी.

सदरील पर्यटन बससेवेस प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मोठ्या प्रमाणात मिळत असून उत्पन्नातही वाढ झालेली आहे. तसेच **पुणे शहरातील नऱ्हे आंबेगाव मधील शिवसृष्टी व स्वामी नारायण मंदिर** ही दोन स्थळे प्रख्यात असून अनेक पर्यटक या स्थळांना भेट देत असतात. त्यामुळे पर्यटकांच्या मागणीनुसार व परिवहन महामंडळाचे उत्पन्न वाढीचे दृष्टीने **दिनांक ०५/०८/२०२४ पासून नवीन पर्यटन बससेवा क्र. ८ सुरू करणेत येत आहे.** सदरील पर्यटन बससेवेच्या मार्गामध्ये खालीलप्रमाणे ऐतिहासिक, धार्मिक व प्रेक्षणीय स्थळांचा समावेश करण्यात आला आहे.

| अ.क्र. | स्थळांची नावे | स्थळे खुले असण्याच्या वेळा | स्थळे बंद असण्याचे वार |
|---|---|---|---|
| - | पुणे स्टेशन डेपो (बस सुटण्याचे ठिकाण) | सकाळी – ०८.३० | - |
| - | डेक्कन जिमखाना बसस्थानक (बस सुटण्याचे ठिकाण) | सकाळी – ०८.४५ | - |
| १ | राजीव गांधी प्राणी संग्रहालय | सकाळी – ०९.३० ते सायं. ०५.३० | बुधवार |
| २ | इस्कॉन मंदिर, कोंढवा रोड | **सकाळी ०७.०० ते सकाळी ११.००<br>दुपारी ०४.०० ते रात्रौ ०८.००** | नियमित सुरू |
| ३ | **शिवसृष्टी आंबेगाव** | **सकाळी १०.०० ते रात्रौ ०८.००** | नियमित सुरू |
| ४ | **स्वामी नारायण मंदिर आंबेगाव** | **सकाळी ०७.०० ते सकाळी ११.००<br>दुपारी ०४.०० ते रात्रौ ०८.००** | नियमित सुरू |
| - | डेक्कन जिमखाना बसस्थानक (पोहोचण्याचे ठिकाण) | सायंकाळी – ०६.३० | - |
| - | पुणे स्टेशन डेपो (पोहोचण्याचे ठिकाण) | सायंकाळी – ०६.०० | - |

# पीएमपीएमएल पर्यटन बससेवेबाबत इतर माहिती खालीलप्रमाणे

१. बसेसच्या आसन क्षमतेनुसार पूर्ण ३३ प्रवाशांचे ग्रुप तिकीट काढल्यास ५ प्रवाशांच्या तिकीट दरामध्ये १०० टक्के सवलत देण्यात येईल .
२. परिवहन महामंडळाकडून सर्व पर्यटन बससेवेचे दर प्रतिव्यक्ती प्रतिमार्गाकरीता रू. ५००/- निश्चित करण्यात आलेला आहे. तसेच पर्यटन बससेवेकरीता बुकिंग - १) डेक्कन जिमखाना, २) पुणे स्टेशन, ३) स्वारगेट, ४) कात्रज, ५) हडपसर गाडीतळ, ६) भोसरी बसस्थानक, ७) निगडी, ८) मनपा भवन या पास केंद्रांवरून करण्यात येते.
३. सदरील बससेवेस ज्या दिवशी प्रवाशांचा अल्प प्रतिसाद लाभेल तसेच काही अपरिहार्य कारणास्तव सदरची बससेवा रद्द झाल्यास त्या प्रवाशांना इतर दिवशी (त्या पुढील आठवड्याच्या शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी) प्रवास करण्याची मुभा राहील.
४. सदरील बससेवेचे ज्या दिवशी बुकींग केले असेल त्या दिवशी सदर प्रवासास राहत्या घरापासून बस सुटण्याच्या ठिकाणापर्यंत व सायंकाळी पोहचल्यानंतर त्यांना त्यांच्या राहत्या घरापर्यंत सदरील तिकिटावर अन्य मार्गाच्या बसेसमधून प्रवास करण्याची मुभा राहील.
५. प्रवाशांना मार्गदर्शन करण्याकरिता प्रत्येक बसमध्ये गाईड सेवकाची नेमणूक करण्यात येणार आहे.
६. सदरील पर्यटन बससेवेचे तिकिट बुकिंग व स्थळांसंदर्भातील माहिती करीता पीएमपीएमएल चे समन्वयक सेवक श्री. नितीन गुरव मो.क्र. ९८५०५०१८६२ यांचेशी संपर्क साधावा.

तरी पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या पर्यटन बससेवेचा लाभ निसर्गप्रेमी, पर्यटक व भाविकांनी घ्यावा असे आवाहन करणेत येत आहे.

**sd/-**
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. ०१/०८/२०२४

मा. संपादक,
दैनिक .........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**sd/-**
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---